# जिल्हाधिकारी कार्यालय, ( निवडणूक शाखा ), पुणे

Rs 380/-

22nd - 4 PM.

फोन फॅक्स - ०२०-२६१२२३४८

e-mail : dydeopune@gmail.com


क्र.पीई-२/एसआर/१६/२०१३
दिनांक:- २१/०३/२०१३

प्रति,

श्रीमती कनिज ई फातेमह सुखराणी,
अे-३, हर्मेस ड्रोम १,
२११/३/१ बी विमान नगर,
पुणे ४११०१४

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नूसार माहिती मिळणे बाबत**

**संदर्भ :- आपला दिनांक १२/०३/२०१३ चा अर्ज**

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दिनांक १२/०३/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. आपण सादर केलेल्या अर्जामध्ये आधार कार्ड संबंधी माहिती मिळणेची मागणी केलेली आहे.

या बाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यातील रहिवाशांना केंद्र पुरस्कृत आधार प्रकल्पा अंतर्गत एकमेव ओळख क्रमांक (UID) देणे बाबत शासनाकडील परीपत्रके आदेश इत्यादीची संचिका या कार्यालयामध्ये उपलब्ध असून संचिकेची एकूण १९० पाने आहेत. प्रत्येक पानास रु. २.०० प्रमाणे होणारी शासकीय फी रु. ३८० (तीनशे ऐंशी फक्त) या कार्यालयात जमा केलेस आपणास अभिलेख उपलब्ध करुन दिली जातील.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलक १९ अन्वये हा निर्णय प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडे अपिल दाखल करता येईल.

ogal

**( आर. बी. उगले )**
**तहसिलदार निवडणूक तथा**
**जनमाहिती अधिकारी, (निवडणूक शाखा)**
**जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे**